## बचतीची आवश्यकता का असते?



### भविष्यातील गरजांसाठी

बचतीमुळे जमा होणाऱ्या मोठ्या रकमेने, आज ज्या वस्तु आपण घेऊ शकत नाही, त्या भविष्यात घेऊ शकतो



### आकस्मिकता

अपघात, आजारपण, मृत्यू अशा कारणासाठी येणारे आकस्मिक व तातडीचे खर्च



### मोठे खर्च

घर खरेदी, विवाह, शिक्षण इत्यादी मोठ्या खर्चांची तरतूद

## घरात रोख रक्कम ठेवण्यातील तोटे



### असुरक्षितता

नैसर्गिक आपत्ति ,चोरी यामुळे घरात ठेवलेले धन नष्ट होऊ शकते



### धन वृद्धीची संधि मावळते

घरीच धन ठेवल्याने त्यावर कोणतेही व्याज मिळत नाही



### ऋण पात्रता न राहणे

बँकेशी व्यवहार केल्याने ऋण पात्रता वृद्धिंगत होते

## बँकांची गरज का असते?

पैशांची सुरक्षा

चिट फंड व खाजगी सावकारीची जोखीम टाळण्यासाठी

बचतीची सवय लागण्यासाठी




कर्ज पुरवठा करण्यासाठी

व्याज मिळवण्यासाठी

धनादेश डिमांड ड्राफ्ट ने धनप्रेषण करणे

## बँकेत खाते उघडण्यासाठी लागणारी कागदपत्रे



पासपोर्ट




पॅन कार्ड




वाहनचालक परवाना




आधारकार्ड




मतदार ओळखपत्रे



छायाचित्र




मनरेगा कार्ड

### या पैकी कोणतेच कागदपत्र नसल्यास

स्वत:चा फोटो व पत्ता बँक अधिकाऱ्यास देऊन, त्यांचे समोर स्वाक्षरी करून छोटे खाते उघडता येते

## बँकेच्या विविध सेवा



### आवर्ती ठेव खाते

दरमहा ठराविक रक्कम रक्कम जमा करून जास्त व्याजदराच्या लाभासह मोठी रक्कम मिळते



### बचत खाते

सर्वसामान्य व्यवहारासाठी सुलभतेने खात्यात रक्कम ठेवता व काढता येते. पासबुक व चेकबुक कार्ड सुविधा उपलब्ध



### मुदत ठेव खाते

7 दिवस ते 10 वर्षे या अवधीसाठी बँकेत मुदत ठेवी ठेवून ज्यादा व्याज मिळविता येते



### शैक्षणिक कर्ज

उच्च/व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी भारतात 10 लाखापर्यंत व विदेशात शिक्षण घेण्यासाठी 20 लाख रुपयापर्यंतचे कर्ज



### ओव्हरड्राफ्ट

पात्रतेनुसार पत मर्यादा मंजूर होऊन खात्यातून गरजेनुसार पैसे काढण्याची सोय

## बँकेच्या अतिरिक्त सेवा सुविधा



### ए.टी.एम.

ए.टी.एम. मशीन मधून पैसे काढणे / रूपे डेबीट कार्ड

### बँक मित्र मायक्रो ए.टी.एम.सह

खाते उघडणे / पैसे काढणे / ठेवी, पैसे हस्तांतरीत करणे / विमा योजना






### शाखा

सर्व बँकींग सेवा

### पॉईंट ऑफ सेल (विक्री केंद्र)

खरेदी आणि मर्यादित रक्कम काढणे





### मोबाईल बँकींग

निधी हस्तांतरण, आयएमपीएस, बिल पेमेंट्स

### इंटरनेट बँकिंग

निधी हस्तांतरण, बिल पेमेंट करणे, ऑनलाईन शॉपिंग, तिकीट आरक्षण






### मोबाईल पाकीटे

मोबाईल अधारित पाकीटसदृश सुविधा, त्यात आधीच काही रक्कम भरून ऑनलाईन किंवा ऑफलाईन खर्च




### नॅशनल इलेक्ट्रॉनिक्स फंड ट्रान्सफर (एन.ई.एफ.टी.)

दोन लाखापर्यंत रकमेचे कुठल्याही दुसऱ्या बँक खात्यात शीघ्र अंतरण

### आर.टी.जी.एस. (रिअल टाईम ग्रॉस सेटलमेंट)

दोन लाखा पुढच्या रकमेचे कुठल्याही दुसऱ्या बँक खात्यात शीघ्र अंतरण

# प्रधानमंत्री जनधन योजना

- मा. पंतप्रधानांच्या हस्ते 28 ऑगस्ट 2014 ला योजनेचे उद्घाटन.
- ग्रामिण आणि शहरी भागातील कुटुंबासाठी योजना
- 1 लाख रुपयाची अपघात विमा समाविष्ट असलेले रूपे डेबिट कार्ड
- 5000 रुपयांपर्यंत ओव्हरड्राफ्टची सोय.

## बँकांचे व्यवहार लेख/साधने




धनादेश

डिमांड ड्राफ्ट



## ए.टी.एम. डेबिट कार्ड
## रुपे डेबिट कार्ड




पिन नंबर वापरुन ए टी एम / मायक्रो ए टी एम मधून पैसे काढणे , दुकानात पॉइंट ऑफ सेल मशिनद्वारे खरेदीची सोय

## विमा



आयुर्विमा





सर्वसाधारण विमा

### विमा म्हणजे काय?

**भविष्यातील नुकसानीपासून संरक्षण**

विविक्षित काळासाठी ,ठराविक रकमेचा वैयक्तिक वा मालमत्तेचा विमा काढण्यासाठी , निश्चित रकमेचे हफ्ते भरणे ज्यामुळे विमाकालात इजा झाल्यास वा मृत्यू झाल्यास निर्धारित रक्कम मिळू शकते . घर ,वाहन , व इतर मालमत्तेचे नुकसान झाल्यास भरपाई मिळते

## सामाजिक सुरक्षा योजना

**प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना**

वार्षिक 12/- प्रिमियम भरून 2 लाख रुपयापर्यंतच्या अपघात विमा योजना.
(वय 18 ते 70)

**प्रधानमंत्री जीवन ज्योति बीमा योजना**

वार्षिक 330/- रुपयाचा प्रिमियम हफ्ता भरून 2 लाख रुपये किंमतीचा आयुर्विमा
(वय 18 ते 50)

**अटल पेंशन योजना**

1 हजार ते 5 हजारपर्यंतचे निश्चित निवृत्तीवेतन
(वय 18 ते 40)

## निवृत्तीवेतन

निवृत्तीनंतर ठराविक उत्पन्न मिळविण्यासाठी पैसे बाजूला टाकण्याची योजना



## सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी

सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी ही बचत आणि कर बचतीचा लाभ देणारी योजना आहे. यात छोट्या रकमेची नियमित बचत करून त्या द्वारे चांगले उत्पन्न आणि आयकर सवलत मिळवता येते.

PPF PENSIONS FUND

# प्रधान मंत्री मुद्रा योजना (पीएमएमवाय)

- **माननीय पंतप्रधानांनी 08.04.2015 रोजी प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा प्रारंभ केला. ही योजना "सिडबी" म्हणजेच स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँकेची उपकंपनी आहे.**
- नॉन-कॉर्पोरेट अशा छोट्या व्यावसायिकांना वित्तीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे.
- छोटे उत्पादन करणारे उद्योग, दुकाने, फळ/भाजी विक्रेते, ट्रक आणि टॅक्सी व्यवयाय करणारे, अन्न सेवा देणारी केंद्रे, दुरूस्ती करून देणारी दुकाने, लघु उद्योग, घरगुती अन्न प्रक्रिया, फेरीवाले आणि अन्य असंख्य छोट्या व्यावसायिकांना प्रोत्साहन देणे, त्यांना बँकेमार्फत वित्तीय कर्ज मिळवून देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

**मुद्रा धोरण**

गरीबांच्या सर्वसमावेशक सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी जागतिक पातळीवरील पद्धती आणि दर्जानुसार एकात्मिक वित्तीय आणि साहाय्यभूत सेवा पुरवठादार होणे.

**मुद्रा मोहीम**

आर्थिक आणि वित्तीय सुरक्षेचे ध्येय साकारण्यासाठी आमच्या भागीदार संस्थांच्या मदतीने सर्वसमावेशक, शाश्वत आणि मूल्याधारित उद्योजकीय संस्कृतीची स्थापना करणे.

**मुद्रा ध्येय**

भागीदार संस्थांना प्रेरित करून व पाठींबा देऊन लघुउद्योग क्षेत्राला वाढीसाठी पूरक आर्थिक वातावरण निर्मिती करून विकास साध्य करण्याचा आमचा मूलभूत उद्देश आहे.

**प्रश्न : आपणास माहित आहे का, की तांत्रिक पदवीधर सुद्धा मुद्रा योजने अंतर्गत कर्ज घेऊ शकतात?**

उत्तर : व्यवसाय आणि प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी या वर आधारीत आपण नियमानुसार "मुद्रा" साठी नेमलेल्या मध्यस्थांमार्फत कर्ज पुरवठ्याचा लाभ घेऊ शकता.

## कर्जाची वर्गवारी

**शिशू**

50,000/- रुपयांपर्यंत

**किशोर**

50,000 हजार ते
5 लाख रुपयापर्यंत

**तरूण**

5 लाख ते 10 लाख
रुपयापर्यंत

जामीनदाराची गरज नाही

शिशु कर्जासाठी प्रोसेसिंग फी अथवा मार्जिन मनीची गरज नाही







रु. 10 लाखापेक्षा कमी गुंतवणुकीची गरज असलेले निर्मिती, प्रक्रिया किंवा सेवा क्षेत्रातील उद्योग (बिगरकृषी क्षेत्रे) सुरू करून उत्पन्न मिळवू इच्छिणारे कोणतेही भारतीय नागरीक.

‘रूपे’ डेबिट कार्डाच्या स्वरूपात ‘मुद्रा’ कार्ड संबंधिताला दिले जाईल. त्याद्वारे एटीएम मशीन, बँक मित्र अथवा पीओएसच्या माध्यमातून ‘ओव्हरड्राफ्ट’च्या स्वरूपात खेळते भांडवल पुरवले जाईल.

## प्रधानमंत्री मुद्रा योजने अंतर्गत कर्ज कसे मिळवावे?



कर्जदार

व्यवसायाची योग्य निवड

कर्जाचा अर्ज




सार्वजनिक/खासगी क्षेत्रातील व्यापारी बँक, पीआरबी किंवा सहकारी बँक



कर्ज अर्जावर योग्य प्रक्रिया



कर्जासाठीच्या कागदपत्रांची अंमलबजावणी

मंजुरी/कर्जाचे वितरण

अधिक तपशीलासाठी जवळच्या कोणत्याही बँक शाखेला भेट द्या किंवा www.mudra.org.in वर लॉग ऑन करा.